**पुणे महानगरपालिका**

**जाहिरात प्रकटन**

समाज विकास विभाग कार्यालयांतर्गत खालील अस्थायी पदांवर ०६ महिन्यांकरीता करार पध्दतीने एकवट मानधनावर सेवा घ्यावयाची असल्याने अनुभवधारक उमेदवारांकडून फक्त ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविणेत येत आहेत.

१.फोटोग्राफी, व्हिडीओ शुटींग व फोटो लॅमिनेशन,अॅडव्हान्स कोर्स– कलर फोटोग्राफी व कलर प्रोसेसिंग, डिजिटल फोटोग्राफी प्रशिक्षक, वायरींग , २.मोटार रिवायंडींग व विद्युत उपकरण दुरूस्ती प्रशिक्षक, ३.फ्रिज, ए.सी. दुरूस्ती प्रशिक्षक, ४.मोबाईल दुरूस्ती प्रशिक्षक, ५.फॅशन डिझायनिंग प्रशिक्षक, ६.एम्ब्रॉयडरी प्रशिक्षक, ७.ब्युटीपार्लर प्रशिक्षक, ८.दुचाकी वाहन दुरूस्ती प्रशिक्षक, ९.दुचाकी वाहन दुरूस्ती प्रशिक्षण वर्ग सहाय्यक, १०.चार चाकी वाहन दुरूस्ती प्रशिक्षक, ११.चारचाकी वाहन दुरूस्ती प्रशिक्षण वर्ग सहाय्यक, १२.कम्प्युटर टायपिंग प्रशिक्षक, १३.इंग्रजी संभाषण कला प्रशिक्षक, १४.जेन्टस पार्लर ( बेसिक व अॅडव्हान्स) प्रशिक्षक, १५.संगणक हार्डवेअर ,LINUX (RED HAT) प्रशिक्षक, १६. संगणक बेसिक, MS-CIT, Tally9.0 ERA, D.T.P, CC++प्रशिक्षक, १७. शिलाई मशीन दुरूस्तीकार, १८.एम्ब्रॉयडरी मशीन दुरूस्तीकार, १९.प्रशिक्षण केंद्र–कार्यालयीन सहाय्यक, २०.प्रशिक्षण केंद्र समन्वयक, २१.प्रकल्प समन्वयक,२२.प्रशिक्षण केंद्र–स्वच्छता स्वयंसेवक

१. ऑनलाईन अर्ज दि.२८/०७/२०२० ते २९/०७/२०२० अखेर संध्याकाळी ०५ :३० वाजेपर्यंत करता येतील. (अर्ज मराठी मध्ये भरणे आवश्यकआहे.) समक्ष अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

२. या नियुक्ती साठी ऑनलाईन अर्ज करण्याची लिंक, आवश्यक इतर अटी व शर्ती, सुचना, निवड पध्दत इ. माहिती पुणे महानगरपालिकेच्या pmc.gov.in या संकेतस्थळावर भरती या सदरात प्रसिध्दीस दिलेली आहे. त्याचे अवलोकन करून उमेदवारांनी अर्ज करावेत.

**टिप–**१. वरील प्रशिक्षण कोर्सेस कोवीड–१९ च्या अनुषंगाने फक्त ऑनलाईन कोर्सेस सुरू करता येतील. जे कोर्स ऑनलाईन घेणे शक्य नाही त्यांची फक्त नेमणूक होईल परंतू कोविड–१९ प्रादुर्भावातील काळात सुरू करता येणार नाहीत. प्रत्यक्ष कोस सुरू होण्यापूवी २ दिवस अगोदर निवड झालेल्या उमेदवारांना कळविण्यात येईल.

२. छाननी अंती फक्त पात्र लाभार्थी यांस प्रत्यक्ष अर्ज कागदपत्रांसह जमा करण्या बाबतच्या सूचना अर्जातील नमूद केलेल्या मोबाईल क्रमांकावर एसएमएस द्वारे व संकेतस्थळावर भरती या सदरात प्रसिध्द करण्यात येतील. या संदर्भात कोणताही वैयक्तिक पत्रव्यव्हार कार्यालयाकडून केला जाणार नाही. तसेच याबाबत कोणतीही प्रत्यक्ष चौकशी करण्यात येवू नये.

सही/–

**(संजय गावडे)**

**उप आयुक्त**

समाज विकास विभाग

पुणे महानगरपालिका

## पुणे महानगरपालिका

## जाहिरात प्रकटन

समाज विकास विभाग कार्यालयांतर्गत खालील अस्थायी पदांवर ०६ महिन्यांकरीता करार पध्दतीने एकवट मानधनावर सेवा घ्यावयाची असल्याने अनुभवधारक उमेदवारांकडून फक्त ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविणेत येत आहेत.

| क्र | हुद्दा | शैक्षणिक अर्हता | अनुभव | एकूण पदांची संख्या | गट | एकवट मासिक मानधन र. रू. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | फोटोग्राफी, व्हिडीओ शुटींग व फोटो लॅमिनेशन, ॲडव्हान्स कोर्स– कलर फोटोग्राफी व कलर प्रोसेसिंग, डिजिटल फोटोग्राफी प्रशिक्षक | एक वर्ष कालावधीचे विषयांकित शासनमान्य प्रशिक्षण उत्तीर्ण | विषय शिकविण्याचा दोन वर्षांचा अनुभव | १ | सर्वसाधारण–१ | ९,७५०/– ( प्रति बॅच) |
| २ | वायरींग , मोटार रिवायंडींग व विद्युत उपकरण दुरूस्ती प्रशिक्षक | एक वर्ष कालावधीचे विषयांकित शासनमान्य आय टी आय उत्तीर्ण | विषय शिकविण्याचा दोन वर्षांचा अनुभव | १ | सर्वसाधारण–१ | ९,७५०/– ( प्रति बॅच) |
| ३ | फ्रिज, ए.सी. दुरूस्ती प्रशिक्षक | विषयाकिंत डिप्लोमा / शासनमान्य आय टी आय उत्तीर्ण | विषय शिकविण्याचा दोन वर्षांचा अनुभव | १ | सर्वसाधारण–१ | ९,७५०/– ( प्रति बॅच) |
| ४ | मोबाईल दुरूस्ती प्रशिक्षक | डिप्लोमा (इलेक्ट्रॉनिक) /विषयांकित शासनमान्य प्रशिक्षण उत्तीर्ण/एम.सी.व्ही.सी | विषय शिकविण्याचा दोन वर्षांचा अनुभव | १ | सर्वसाधारण–१ | ९,७५०/– ( प्रति बॅच) |
| ५ | फॅशन डिझायनिंग प्रशिक्षक | शिवणकामाचा शासनमान्य एक वर्षाचा प्रशिक्षण वर्ग पूर्ण | विषय शिकविण्याचा दोन वर्षांचा अनुभव | ३ | अज–१, इमाव –१ खुला–१ | ९,७५०/– ( प्रति बॅच)) |
| ६ | एम्ब्रॉयडरी प्रशिक्षक | विषयाकिंत एक वर्षाचा प्रशिक्षण वर्ग पूर्ण | विषय शिकविण्याचा दोन वर्षांचा अनुभव | १ | सर्वसाधारण–१ | ९,७५०/– ( प्रति बॅच)) |
| ७ | ब्युटीपार्लर प्रशिक्षक | ब्युटीपार्लर एबीटीसी/सिडेस्को प्रशिक्षण उतीर्ण | विषय शिकविण्याचा दोन वर्षांचा अनुभव | ३ | अज–१, इमाव –१ खुला–१ | ९,७५०/– ( प्रति बॅच) |
| ८ | दुचाकी वाहन दुरूस्ती प्रशिक्षक | एक वर्ष कालावधीचे विषयांकित शासनमान्य आय टी आय उत्तीर्ण/डिप्लोमा इन ऑटोमोबाईल इंजिनियरींग | विषय शिकविण्याचा दोन वर्षांचा अनुभव | १ | सर्वसाधारण–१ | ९,७५०/– ( प्रति बॅच) |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | /एन.सी.टी .व्हि.टी उत्तीर्ण | | | | |
| **९** | दुचाकी वाहन दुरूस्ती प्रशिक्षण वर्ग सहाय्यक | विषयांकित किमान सहा महिने कालावधीचे प्रशिक्षण उत्तीर्ण | विषयांकित कामाचा दोन वर्षांचा अनुभव | १ | सर्वसाधारण–१ | ६,०००/– ( प्रति बॅच) |
| **१०** | चार चाकी वाहन दुरूस्ती प्रशिक्षक | एक वर्ष कालावधीचे विषयांकित शासनमान्य आय टी आय उत्तीर्ण/डिप्लोमा इन ऑटोमोबाईल इंजिनियरींग | विषय शिकविण्याचा दोन वर्षांचा अनुभव | १ | सर्वसाधारण–१ | ९,७५०/– (प्रति बॅच) |
| **११** | चारचाकी वाहन दुरूस्ती प्रशिक्षण वर्ग सहाय्यक | विषयांकित किमान सहा महिने कालावधीचे प्रशिक्षण उत्तीर्ण | विषयांकित कामाचा दोन वर्षांचा अनुभव | १ | सर्वसाधारण–१ | ६,०००/– ( प्रति बॅच) |
| **१२** | कम्प्युटर टायपिंग प्रशिक्षक | इ. १२ वी उत्तीर्ण व शासकिय टंकलेखन परीक्षा इंग्रजी ६० श.प्र.मि., मराठी ४० श.प्र.मि व हिंदी ४० श.प्र.मि. उत्तीर्ण एम एसस ी आयटी उत्तीर्ण | विषय शिकविण्याचा दोन वर्षांचा अनुभव | २ | अज–१,<br>खुला–१ | ६,०००/– ( प्रति बॅच) |
| **१३** | इंग्रजी संभाषण कला प्रशिक्षक | बी.ए ( इंग्लिश) /एम.ए(इंग्लिश) | विषय शिकविण्याचा दोन वर्षांचा अनुभव | ३ | अज–१,<br>इमाव –१<br>खुला–१ | ६,५००/– ( प्रति बॅच) |
| **१४** | जेन्टस पार्लर ( बेसिक व ॲडव्हान्स) प्रशिक्षक | ब्युटीपार्लर एबीटीसी/सिडेस्को प्रशिक्षण उत्तीर्ण | विषय शिकविण्याचा दोन वर्षांचा अनुभव | १ | सर्वसाधारण–१ | ९,७५०/– (प्रति बॅच) |
| **१५** | संगणक हार्डवेअर ,LINUX (RED HAT) प्रशिक्षक | बी.ई. (इलेक्ट्रॉनिक) | विषय शिकविण्याचा दोन वर्षांचा अनुभव | २ | अज–१,<br>खुला–१ | ९,७५०/– ( प्रति बॅच) |
| **१६** | संगणक बेसिक , MS-CIT ,Tally 9.0 ERA ,D.T.P, CC++ प्रशिक्षक | बी.सी.ए /एम.सी.ए/ बी.सी.एस./ एम.सी.एस. /एम.सी.एम | विषय शिकविण्याचा दोन वर्षांचा अनुभव | ६ | अजा–१,<br>अज–१,<br>इमाव–१<br>एसइबीसी–१<br>विजाअ–१<br>खुला–१ | ९,७५०/– ( प्रति बॅच) |
| **१७** | शिलाई मशीन दुरूस्तीकार | ––– | विषयांकित कामाचा ३ वर्षाचा अनुभव | १ | सर्वसाधारण–१ | १८,२५०/– |
| **१८** | एम्ब्रॉयडरी मशीन दुरूस्तीकार | ––– | विषयांकित कामाचा ३ वर्षाचा अनुभव | १ | सर्वसाधारण–१ | १८,२५०/– |
| **१९** | प्रशिक्षण केंद्र–कार्यालयीन सहाय्यक | किमान १२ वी उत्तीर्ण , मराठी टायपिंग शब्द प्रति मिनीट ३० | प्रशिक्षण केंद्रातील कामाचा ३ वर्षाचा | ३ | अज–१,<br>एसइबीसी–१ | १९,२५०/– |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | किंवा इंग्रजी टायपिंग शब्द प्रति मिनीट ४०, एम.एस.सी.आय.टी | अनुभव | | खुला–१ | |
| **२०** | प्रशिक्षण केंद्र समन्वयक | MSW/ पदवीधर MSW उमेदवारास प्राधान्य देणेत येईल | समाज उपयोगी कामाचा किमान ३ वर्षाचा अनुभव | ३ | अज–१, एसइबीसी–१ खुला–१ | १९,२५०/– |
| **२१** | प्रकल्प समन्वयक | MSW/ पदवीधर MSW उमेदवारास प्राधान्य देणेत येईल | समाज उपयोगी कामाचा किमान ३ वर्षाचा अनुभव | २ | विजाअ– १, खुला–१ | १९,२५०/– |
| **२२** | प्रशिक्षण केंद्र–स्वच्छता स्वयंसेवक | साक्षर | –––––– | ३ | विजाअ– १, एसइबीसी–१ खुला–१ | १६,७५०/– |

## <u>उमेदवारांकरिता सर्वसाधारण अटी</u>

१. अ.क्र .१ ते १८ या पदांकरिता वयोमर्यादा किमान १८ वर्षे व कमाल ५८ वर्ष अशी राहिल. अ.क्र. १९ ते २२ या पदांकरिता समाज विकास विभागाकडील कामाचा अनुभव असणा–या उमेदवारांकरिता वयोमर्यादा वय वर्षे ५८ पर्यंत व इतर उमेदवारांना शासन निर्णयानुसार मागासवर्गीय उमेद्वारांसाठी वय वर्ष ४३ व खुल्या गटातील उमेद्वारांसाठी वय वर्ष ३८ अशी राहिल.
२. समाज विकास विभागाकडील कामाचा अनुभव असणा–या उमेदवारास प्राधान्य देणेत येईल.
३. वरील पदांशी निगडीत कामकाजाचा अनुभव असणा–या उमेदवारांना प्राधान्य देणेत येईल.
४. उच्च शैक्षणिक पात्रता धारण करणाऱ्या उमेदवारास प्राधान्य देणेत येईल.
५. सदरचे पद अस्थायी स्वरूपाचे आहे.
६. सर्व पदांच्या नेमणूका उमेदवारांची शैक्षणिक पात्रता, अनुभव, तांत्रिक कौशल्य, संगणक कौशल्य इ. च्या आधारे परिक्षण करून गुणानुक्रमे करणेत येणार आहे.
७. पात्र उमेदवारांनी अर्जासोबत एक पासपोर्ट आकाराचा फोटो तसेच आवश्यक मूळ कागदपत्रांच्या छायांकित सत्य प्रतीचा एक संच सादर करणे आवश्यक आहे.
८. सूचना प्राप्त लाभार्थ्यांने अर्जासोबत शाळा सोडल्याचा दाखला, शैक्षणिक पात्रतेचे दाखले, अनुभवाचा दाखला, मागासवर्गीय असल्यास जातीचा दाखला व इतर आवश्यक कागदत्रे साक्षांकित करून जोडणे आवश्यक आहे.
९. अर्जामध्ये संपूर्ण माहिती दिली नसल्यास तसेच पात्र अर्जा सोबत उपरोक्त नमूद दाखल्याच्या प्रती जोडलेल्या नसल्यास अश्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.
१०. ऑनलाईन अर्ज दि.२८/०७/२०२० ते २९/०७/२०२० अखेर सायंकाळी ०५ : ३० पर्यंत करता येतील. समक्ष अर्ज स्विकारले जाणार नाहीत.
११. या नियुक्ती साठी ऑनलाईन अर्ज करण्याची लिंक, आवश्यक इतर अटी व शर्ती, सुचना, निवड पध्दत इ. माहिती पुणे महानगरपालिकेच्या pmc.gov.in या संकेतस्थळावर **भरती** या सदरात प्रसिध्दीस दिलेली आहे. त्याचे अवलोकन करून उमेदवारांनी अर्ज भरावे.
१२. अर्जामध्ये संपुर्ण माहिती दिलेली नसल्यास तसेच पात्र अर्जा सोबत उपरोक्त नमुद दाखल्याच्या प्रती जोडलेल्या नसल्यास अशा अर्जाचा विचार केला जाणार नाही. अर्जासोबत दिलेली माहिती व मुळ कागद पत्रात काही दोष आढळल्यास अशा नेमणूका बाद करणेत येतील.

१३. निवड झालेल्या उमदेवारांना विहीत नमुन्यात कारारनामा करून फक्त ६ महिन्यांकरीता नेमणूक दिली जाईल. करार संपल्यानंतर नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल. त्याकरिता पुन्हा पत्र व्यवहार केला जाणार नाही.
१४. सदर नियुक्त्या मानधन तत्वावर ६ महिने मुदती करिता होणार असल्याने निवड झालेल्या उमेदवारांना मनपाच्या आस्थापने वरील कोणत्याही पदावर कायमस्वरूपी नियुक्ती करिता हक्क सांगता येणार नाही. तसेच मनपा कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेले कोणतेही लाभ मिळण्यास ते पात्र ठरणार नाही.
१५. वरील पदासाठी कामाचे स्वरूप ठरविण्याचे अधिकार मा. खातेप्रमुख यांना राहिल.
१६. अपात्र ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.
१७. निवड प्रक्रियेचे अंतिम अधिकार मा.अति. महापालिका आयुक्त (वि) पुणे महानगरपालिका यांनी राखुन ठेवले आहेत.
१८. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार अर्हताधारक असणारा न आढळल्यास, गैरवर्तन करताना आढळल्यास, दबाव तंत्राचा वापर करताना आढळल्यास उमेदवारी आपोआप रद्दबातल होईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पुर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.
१९. निवड झालेल्या उमेदवारास सेवेत रूजू होण्यापूर्वी एका महिन्याचे मानधन अनामत रक्कम म्हणून पुणे मनपा कडे जमा करावे लागेल तसेच त्यावर कोणत्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही. (प्रशिक्षक पदा करिता एक बॅच मानधन अनामत म्हणून पुणे मनपा कडे जमा करावे लागेल).

sd/-
(संजय गावडे)
उप आयुक्त
समाज विकास विभाग
पुणे महानगरपालिका